# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) नुसार मा.स्थायी समिती सभापती निवडीचे इतिवृत्त.

--*--

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ अन्वयेचे तरतूदी नुसार मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतींची निवड करणे साठी दिनांक ९-०७-२००९ रोजी बोलाविलेल्या विशेष सभेचे इतिवृत्त.

--*--

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा ) नियम २००८ अन्वयेचे मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील आदेश क्र.नपा / १/२/प्र.क्र./जा.क्र.०९ दिनांक ४-०७-२००९ रोजीचे पत्रान्वये दिनांक ९-०७-२००९ रोजी सकाळी ११-०० वा. स्थायी समिती सभापती व महिला बालकल्याण समिती सभापती ,उपसभापती पदासाठी मा.विभागीय आयुक्त , नाशिक विभाग, नाशिक यांनी पिठासीन अधिकारी म्हणून डॉ.श्री.पी.अन्बलगन , जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना प्राधिकृत केले. त्या अनुषंगाने मा.स्थायी समिती सभापती पदावर सभापतीची निवड करणेकामी बोलविण्यात आल्याप्रमाणे मा.स्थायी समिती सभा गुरूवार दिनांक९-०७-२००९रोजी सकाळी ११-०० वा. महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीमध्ये स्थायी समिती सभागृहात सुरू झाली त्यावेळी मा.डॉ.पी.अन्बलगन, जिल्हाधिकारी ,अहमदनगर हे पिठासीन अधिकारी म्हणून तर खालील प्रमाणे मा.स्थायी समिती सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | **सदस्याचे नांव** |
|---|---|
| १ | ढवण शारदाबाई दिगंबर |
| २ | शेंडगे संजय छगन |
| ३ | पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग |
| ४ | शिंदे शिला अनिल |
| ५ | ढोणे मालन सुरेश (वहिनी) |
| ६ | लोंढे शिवाजी बाळासाहेब |
| ७ | शेलार नितीन शिवाजी |
| ८ | शेख नजीर अहमद अ.रज्जाक |
| ९ | पवार दगडू जयवंत |
| १० | गव्हाळे विजय नाना |
| ११ | पवार बाळासाहेब रेवजी |
| १२ | कांबळे रवी दगडू |
| १३ | भोसले गणेश पुंडलिक |
| १४ | बारस्कर पोपट जगन्नाथ |
| १५ | गंभीर इंदरकौर किसनसिंग |
| १६ | गाडे संजय बाबूराव |

सभेच्या कामकाजास सकाळी ११-०० वा.सुरूवात करण्यात आली. सभेच्या सुरूवातीस मा.स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीची कार्यक्रम पत्रिका सभेमध्ये वाचून दाखविण्यात आली. त्यानंतर श्री.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग यांनी त्यांचे पक्षातील सदस्यांना व्हीप बजाविल्याबाबत कल्पना देणेबाबत मा.पिठासीन अधिकारी यांना विनंती केली. मा.जिल्हाधिकारी यांनी गट नोंदणी बाबत मा.मुंबई उच्च न्यायालय चे औरंगाबाद खंडपीठात प्रकरण प्रलंबित आहे. मा.स्थायी समितीच्या सभापतीसाठी एकुण ३ उमेदवारांचे ४ नामनिर्देशन पत्रे नगरसचिव यांचेकडे विहीत मुदतीत दाखल झ ाालेली आहे अशी माहिती उपस्थित सदस्यांना दिली. दाखल झालेले नामनिर्देशन पत्र खालील प्रमाणे.

१.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग
२.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग
३.पवार बाळासाहेब रेवजी
४.गाडे संजय बाबूराव

त्यांनतर मा.पिठासीन अधिकारी यांनी सर्व उपस्थित मा. स्थायी समिती सभासद हजर असल्याची खात्री केली. दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची सकाळी ११-३० वा.छाननी सुरू करण्यात आली.

मा.पिठासीन अधिकारी यांनी मा.स्थायी समिती सभापती पदासाठी दाखल झालेले खालील सर्व नामनिर्देशनपत्र विहीत मुदतीत छाननी अंती वैध असल्याचे अनुक्रमे घोषित केले.

१.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग
२.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग
३.पवार बाळासाहेब रेवजी
४.गाडे संजय बाबूराव

नामनिर्देशन पत्राची छाननी झाल्यानंतर सकाळी ११-४५ ते दुपारी १२-०० वाजेपर्यंत वैध अर्जांपैकी ज्यांना उमेदवारी अर्ज मागे घ्यावयाची आहे, त्यांचेसाठी १५ मिनिटांची वेळ देणेत आली.

माघारीसाठीच्या विहीत मुदतीत सकाळी ११-४९ वा.श्री.पवार बाळासाहेब रेवजी यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घेतला. माघारीसाठीची मुदत ठिक १२.०० वा.संपल्यानंतर स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी अंतिमतः १. श्री. पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग व २. श्री.गाडे संजय बाबूराव यांचे दोन उमेदवारी अर्ज शिल्लक राहिल्याने त्यांना मा.स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी उमेदवार म्हणून घोषित करण्यात आले. सदर उमेदवारांची नांवे आडनांवाच्या इंग्रजी वर्णानुक्रमानुसार लावण्यात आली. ती खालील प्रमाणे.

१. श्री.गाडे संजय बाबूराव

२. श्री.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग

उमेदवारांच्या यादीनुसार प्रथमतः श्री.गाडे संजय बाबूराव यांचे नांव पुकारण्यात येवुन त्यांचे बाजुने ज्या सदस्यांना मतदान करावयाचे त्या सदस्यांना आपला हात वर करून मतदान करणेबाबत पिठासीन अधिकारी यांनी सूचविले. त्यानुसार श्री.गाडे संजय बाबूराव यांच्या बाजुने खालील एकुण उपस्थित सदस्यांनी मतदान केले.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | गंभीर इंदरकौर किसनसिंग |
| २ | गव्हाळे विजय नाना |
| ३ | बारस्कर पोपट जगन्नाथ |
| ४ | शेख नजीर अहमद अ.रज्जाक |
| ५ | कांबळे रवी दगडू |
| ६ | पवार बाळासाहेब रेवजी |
| ७ | पवार दगडू जयवंत |
| ८ | गाडे संजय बाबूराव |
| ९ | भोसले गणेश पुंडलिक |

उमेदवारांच्या यादीनुसार नंतर श्री.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग यांचे नांव पुकारण्यात येवुन त्यांचे बाजुने ज्या सदस्यांना मतदान करावयाचे त्या सदस्यांना आपला हात वर करून मतदान करणेबाबत पिठासीन अधिकारी यांनी सूचविले. त्यानुसार श्री.पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग यांच्या बाजुने खालील एकुण उपस्थित सदस्यांनी मतदान केले. सदर उमेदवारांची नांवे खालील प्रमाणे.

| अ.नं. | सदस्याचे नांव |
|---|---|
| १ | लोंढे शिवाजी बाळासाहेब |
| २ | ढोणे मालन सुरेश (वहिनी) |
| ३ | ढवण शारदाबाई दिगंबर |
| ४ | शिंदे शिला अनिल |
| ५ | शेलार नितीन शिवाजी |
| ६ | शेंडगे संजय छगन |
| ७ | पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग |

गाडे संजय बाबूराव यांना ९ मते व पंजाबी जसपालसिंग निरंजनसिंग यांना ७ मते प्राप्त झाली.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) ( सुधारणा )

नियम २००८ अन्वये गाडे संजय बाबूराव यांना सर्वाधिक म्हणजे ०९ एवढी मते मिळालेली असल्याने श्री.गाडे संजय बाबूराव हे स्थायी समिती सभापती पदी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठापुढील रिट पिटीशन क्रमांक ३४५९/२००९ च्या अंतिम निर्णयास अधिन राहून निवडून आल्याचे मा.पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

मा.स्थायी समिती सभापती पदाचे निवडणूकीचे घेतलेले फोटो , व्हीडीओ शुटींग , सदर सभेचे नामनिर्देशन पत्र, निकालपत्र व इतर सर्व कागदपत्रे श्री.सदाशिव अनंत हब्बू, नगरसचिव यांचेकडे सुपूर्त करण्यात आलेले आहेत.

अहमदनगर
दिनांक : ०९-०७-२००९.

पिठासीन अधिकारी,
तथा जिल्हाधिकारी ,अहमदनगर